उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग
ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Head Office, Ground Floor, Ulhasangar- ४२१ ००३ Dist Thane, Maharashtra
Tel No:- ९५२५१ २७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४

जा.क्र/उमपा/करवि/१४८/२४
दिनांक : २० /०९/२०२४

संदर्भ:-मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांचेकडील पत्र क्र म.जा.क्र. ३०५४/ २०२४, दिनांक ०२/०९/२०२४

# आदेश

मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली (मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली) यांचे निर्देशानुसार दरवर्षी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले जाते. व सन २०२४ मधील राष्ट्रीय लोकअदालत शनिवार दिनांक: २८ सप्टेंबर २०२४ रोजी संपुर्ण भारतभर आयोजित केलेले आहे.

२) **उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजित १.८२ लाख मालमत्ता असुन वित्तीय वर्ष २०२४-२०२५ करीता एकुण मागणी रु. ९५१.१० कोटी इतकी असुन माहे ऑगस्ट २०२४ पर्यत रक्कम रु. ५२.६२ कोटी इतकी** वसुली झाली आहे.

३) उक्त कराच्या मागणीत पुढील बाबीं समाविष्ट असल्यामुळे करदात्यांचा कर भरणा न करण्याकडे कल आहे.

अ) मालमत्ता कर आकारणीत वाद आहे.

ब) कर आकारणीबाबत न्यायालयात दावे दाखल असुन त्यामध्ये अद्यापही निर्णय प्रलंबित आहेत.

क) आर्थिक अडचणी.

ड) कराच्या मागणीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ अंतर्गत बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारे विलंब शास्ती रक्कम रु. ५१८.९८ कोटीचा समावेश आहे. विलंब शास्तीमुळे कराचे मागणीत सतत वाढ होत आहे.

४) **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ नुसार,मालमत्ता करावरील, नियम ४१ अंतर्गत लागु असलेली विलंब शास्ती माफ करण्याचे अधिकार आयुक्तांना** आहेत.

५) **<u>दिनांक : २८ सप्टेंबर , २०२४ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालत तसेच</u>** मालमत्ता कर वसुलीच्या दृष्टीने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची "ड" मधील प्रकरण ८ (कराधान नियम) चे नियम ५१ नुसार आयुक्तास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मालमत्ता करावरील, अधिनियमाचे नियम ४१ अंतर्गत लागु असलेली विलंब शास्ती माफ करणेबाबत तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**अ) कालावधी :-** दिनांक : २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीसाठी लागु करणे.

**ब) व्याप्ती :-** सदर कालावधीत करदात्याकडे थकीत असलेली मालमत्ता कराची मुळ रक्कम खालीलप्रमाणे महानगरपालिकेत भरणा केल्यास थकीत रक्कमेवर, नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात आलेली विलंब शास्ती नियम ५१ अंतर्गत माफ करणे.

| कालावधी | मागणीचा तपशिल | विलंब शास्ती माफीचा तपशिल |
|---|---|---|
| दिनांक : २८ सप्टेंबर, २०२४ | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम एकरकमी भरणा केल्यास | **१०० टक्के विलंब शास्ती माफ** (थकबाकी रक्कमेवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) |

**ब-१) सदर सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा**:- सदर सवलत ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. या योजनेच्या प्रारंभापुर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. सदर सवलतीच्यापुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

ब-२) दिनांक : २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत सदर सवलत देणेकामी उक्त नमुद केलेप्रमाणे संगणकप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

क ) **सवलतीचा लाभ घेण्यासाठी करदात्यावर खालीलप्रमाणे अटी व शर्ती बंधनकारक राहतील.**

क -१) सवलतीचा लाभ घेण्यासाठी कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

क -२) सवलतीचा लाभ घेतल्यानंतर, कराची रक्कम भरणा केल्यानंतर, कोणतेही अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आवेदने, संदर्भ आवेदने, विविध स्तरावरील न्यायालयात दावा दाखल करणे किंवा रिट याचिका दाखल करता येणार नाही. व तसे केल्यास योजने अंतर्गत दिलेली सवलत काढुन घेण्यात येईल.

ड) **आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे**:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८, कलम ६९ व अधिनियमाचे अनुसूची "ड" मधील प्रकरण ८ (कराधान नियम) चे नियम ५१ नुसार,- आयुक्तास असलेले अधिकार, दिनांक : २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत कर निर्धारक व संकलक यांना प्रदान करणे. सदर कालावधीनंतर हे अधिकार संपुष्टात येतील.

इ) **जनजागृती, प्रसिध्द्‌ी व जाहीरात :-**

इ-१) जास्तीत जास्त प्रमाणात नागरिकांना सवलतीचा लाभ घेता यावा तसेच योजनेस मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी, योजनेचा तपशिल केबल, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, महानगरपालिका संकेतस्थळ इ. द्वारे व्यापक प्रसिध्द्‌ी जनसंपर्क विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, मालमत्ता कर विभागामार्फत करणे.

इ-२) सवलत सुरु होणेपुर्वी वसुली कर्मचारी हे प्रत्येक थकबाकीदाराच्या भेटी घेऊन सदर योजनेचे प्रबोधन करतील व त्यांना थकबाकी भरणेकामी प्रोत्साहीत करणे

इ-३) कर विभागाने थकबाकीदार मालमत्ताधारक/ भोगवटादार यांना सवलतीबाबत जास्तीत जास्त जनजागृती करावी.

उ) दिनांक : २८ सप्टेंबर २०२४ नंतर मालमत्ता कर न भरणाऱ्या कसुरदारांविरुध अधिनियमातील तरतुदींनुसार सक्तीची (मालमत्ता जप्ती/अटकावणी करणे, लिलाव करणे वगैरे) कार्यवाही सुरु करणे.

सदर आदेशाची सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

२०/९/२४

(विकास ढाकणे)
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,

१) कर निर्धारक व संकलक

२) संबंधित उप कर निर्धारक व संकलक/संबंधित कर निरीक्षक